**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**
**(जागतिक बँक सहाय्यीत)**
**गोदाम पावती योजना बळकटीकरण उपप्रकल्पाकरीता प्रस्ताव मागविणेसाठी तपशीलवार माहिती**

**<u>पार्श्वभूमी :-</u>**

- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियानांतर्गत विविध आजीविका घटकांच्या माध्यमातून गरीबी निर्मूलनाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानामुळे ५ लाख स्वयं सहाय्यता गटांची निर्मिती, २२,००० ग्रामसंघ आणि १७३३ प्रभागसंघाची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- राज्यात जे सामाजिक भांडवल आणि पायाभूत सुविधा निर्माण होत आहेत. त्यांच्या आधारे देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेतील संधीचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी अधिक नियोजनबध्द प्रयत्नांची आवश्यकता दिसून आली आहे. त्या अनुषंगाने राज्यात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने **"मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प"** राबविण्यात येत आहे.

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, एमएसआरएलएम मार्फत स्मार्ट प्रकल्पांअंतर्गत राबविण्यात येणारे घटक :-**

१) उत्पादक भागीदारी उप-प्रकल्प(PP)
२) नाविन्यपूर्ण पूरक उप-प्रकल्प (CII)
३) महिलांचे शेतकरी उत्पादक कंपन्याची स्थापना व त्यांची क्षमता बांधणी
४) गोदाम आधारित वखार पावती उपप्रकल्प
५) बीडीएस- व्यवसाय वृधीगंत करणे.

**गोदाम आधारित वखार पावती उपप्रकल्पाची पार्श्वभूमी :-**

- स्मार्ट प्रकल्पांतर्गत जोखीम निवारणेची व्यवस्था उभी करणे हा महत्वाचा घटक आहे. सद्यस्थितीत उत्पादित कृषी माल साठवणूक करणेसाठी सुलभ, वाजवी दरात व नजीकच्या क्षेत्रात गोदाम व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे स्मार्ट प्रकल्पांतर्गत अशी व्यवस्था महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांचे माध्यमातून **गोदाम उपप्रकल्प** राबविण्याचे प्रस्तावित आहे.
- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियानामार्फत तयार झालेल्या महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी नवीन गोदामे उभारणे व या गोदामांमध्ये गोदाम पावती (Warehouse Receipt) योजना राबविणे, शेतमाल तारण व्यवस्थापन (CMA- Collateral Management Agency) संस्थेच्या सहाय्याने संस्थांना गोदाम व्यवसाय उभारणीस सहकार्य करणे व यामाध्यमातून संस्थेचे उत्पन्न वाढविणे, साठविलेल्या शेतमालास बाजारपेठ उपलब्ध करून देणे इ. साठी प्रयत्न सदर घटकांतर्गत करण्यात येत आहेत
- त्यासाठी प्रामुख्याने ज्या ठिकाणी हा प्रकल्प उभा करण्यात येणार आहे, तेथे तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, कापूस इ. शेतमालाचे उत्पादन/ उत्पादकता याचा अभ्यास करुन उत्पादित मालाचा विक्री अधिशेष (Marketable Surplus) आधारित गोदाम व्यवस्था निर्माण करणेचे ध्येय ठरविण्यात आलेले

आहे. यासाठी तत्सम कार्य प्रणाली विकसित करून या संस्थांना गोदाम व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षित करण्यासाठी शेतमाल तारण व्यवस्थापन (CMA-Collateral Management Agency) सेवा पुरवठादार कंपन्यांच्या सहाय्याने गोदाम पावती योजना अंमलबजावणी करणे प्रस्तावित आहे.

**गोदाम पावती योजनेमध्ये खालील महत्वपूर्ण बाबींचा समावेश आहे:**

**अ) नवीन गोदामांची निर्मिती**

त्याअनुषंगाने नवीन गोदाम उभारणी करण्याकरीता प्रकल्पामार्फत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. त्यानुसार सुमारे २५ (क्षमता २५० मे. टन प्रति गोदाम) नवीन गोदामांची निर्मिती करण्यात येणार असून त्या आधारे संबधीत संस्थाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जे प्रस्ताव तांत्रिक व आर्थिकदृष्टया योग्य असतील त्यांना व्यवहार्यता अंतर निधी (VGF) नुसार अनुदान देय आहे. अनुदान मर्यादा जास्तीत जास्त ६०% पर्यंत आहे. उर्वरित रक्कम स्वहिस्सा किंवा ( बँक कर्ज ) उभारणी करणे आवश्यक आहे.

गोदाम पावती योजनेचे बळकटीकरण हा उपघटक राबविण्यासाठी राज्यातील MSRLM मार्फत स्थापित महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून विहित प्रपत्रात अर्ज मागविण्यासाठी पात्रता निकष, अर्जाचे फॉर्म (प्रपत्र १) व अर्जा सोबत संस्थेने जोडावयाची कागदपत्रे (प्रपत्र २) इत्यादी तपशील खालील प्रमाणे आहे.

**<u>उपप्रकल्पांसाठी कोण अर्ज करू शकतो :-</u>**

MSRLM मार्फत स्थापित महिला शेतकरी उत्पादक कंपनी अर्ज करु शकतात. अर्ज सादर करण्याकरिता खालील निकष आवश्यक आहेत.

१. कंपनी कायदयामध्ये नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.
२. भागधारक संख्या - किमान ५०० भागधारक असणे आवश्यक आहे.
३. महिला शेतकरी उत्पादक कंपनीची स्वत:च्या मालकीची जागा किंवा किमान ४ गुंठे जागा २९ वर्षाकरिता भाडेतत्वावर घेण्याची तयारी प्रस्तावीत असावी.
४. जागेकडे जाण्यासाठी कच्चा/डांबरी रस्ता असणे आवश्यक आहे.
५. गोदाम यशस्वीपणे चालविण्यासाठी संस्थेस त्या विभागातील (जिल्हा/तालुका) पिक प्रणाली, मुख्य पिकाचे उत्पादन व उत्पादकता अशा पिकाचा विक्री अधिशेष (Marketable Surplus) त्या विभागात उपलब्ध असणारी साठवणूक क्षमता व नवीन बांधकामास मिळू शकणारा संभाव्य व्यवसाय या संबधित परिपूर्ण माहिती (अचूक आकडेवारी /Data) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे .
६. ज्या महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांनी यापूर्वी स्मार्ट प्रकल्पांतर्गत Call For proposal साठी PP/MAP (उत्पादक-भागीदारी, बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प) करिता अर्ज करून त्यास मंजुरी प्राप्त झालेली असेल अश्या महिला शेतकरी उत्पादक कंपनीना सदर C २.२ घटकाअंतर्गत अर्ज करता येणार नाही.

**<u>महत्वाच्या सूचना :-</u>**

अर्ज भरणेपुर्वी यासोबत असणारी प्रस्ताव मागविणेसाठीची जाहिरातीचे संपुर्ण वाचन करण्यात यावे.

- प्रपत्र- १ मधे अर्ज भरताना सर्व माहिती ही सत्य असावी याबाबत काळजी घ्यावी. अर्ज मागविणेसाठी जाहिरातीमध्ये कोणत्याही मुद्दयाबाबत शंका / प्रश्न असल्यास livelihoods@umed.in ई-मेल वर याबाबत विचारणा करण्यात यावी.
- अर्जासोबत सादर करावयाची महत्वाची कागदपत्रे प्रपत्र-२ मध्ये नमुद करण्यात आलेली आहेत.

**प्रस्ताव सादर करणेबाबत :-**

प्रस्ताव अपेक्षित कागदपत्रांसह सादर करावेत. जाहिराती संदर्भात माहिती, अर्ज सादर करण्यासाठी पात्रतेचे निकष, अर्जाचा नमूना इ. माहिती स्मार्ट प्रकल्पाचे (https://www.smart-mh.org) तसेच **महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियानाचे** (www.umed.in) **या संकेतस्थळावर** उपलब्ध आहे. इच्छूक, महिला शेतकरी उत्पादक कंपनी अर्जाचा नमूना संकेतस्थळावरून डाउनलोड करून प्रिंट घ्यावी, त्यामध्ये माहिती भरून व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडून **"प्रमुख", महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट (पि.आय.यू. - स्मार्ट) राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, ५ वा मजला, (दक्षिण कक्ष) सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई. पिनकोड** ४००६१४, **दूरध्वनी:** ०२२-२७५६२५५२/५४ या पत्यावर दि.**३० /०६ /२०२३** दु. ५.०० पर्यंत पोहोचतील, अशा बेताने ऑफलाईन सादर करावेत.

- अर्ज मागविण्याच्या प्रक्रियेविषयक बदल व कागदपत्रातील बदल व इतर अनुषंगिक प्रकारचे बदल व निर्णय याचे सर्वस्वी अधिकार "प्रमुख", महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान यांचेकडे राहतील याची सर्व अर्जदार महिला शेतकरी उत्पादक कंपनीनी नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही विनंती ग्राह्य धरली जाणार नाही.

---

**टीप:- अधिक माहितीसाठी, कृपया** http://www.smart-mh.org **या वेबसाइटवर उपलब्ध प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) पहावा.**

## प्रपत्र - १

## महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत स्थापित महिला शेतकरी उत्पादक संस्थेने गोदाम उप प्रकल्पाकरिता करावयाचा अर्ज

१) महिला शेतकरी उत्पादक संस्थेचे नाव :-

२) संस्थेचा संपर्क पत्ता :-

३) जबाबदार संचालकाचे नाव :-

४) जबाबदार संचालकाचा संपर्क क्रमांक :-

५) संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक :-

६) संस्थेची भागधारक संख्या :-

(कमीत कमी ५०० भागधारक असणे आवश्यक. सद्यस्थितीत नसल्यास, प्रकल्पात निवड झाल्यानंतर अनुदानाचा प्रथम हप्ता वितरीत करण्यापुर्वी ५०० भागधारक करण्यात येणार असल्याबाबत पत्र सादर करावे)

७) **महिला शेतकरी उत्पादक कंपनीकडील भागभांडवल (रू. लाखात):-**

(कमीत कमी रु.१ लाख असणे आवश्यक. सद्यस्थितीत नसल्यास, प्रकल्पात निवड झाल्यानंतर अनुदानाचा प्रथम हप्ता वितरीत करण्यापुर्वी भागभांडवल पुर्तता करण्यात येणार असल्याबाबत पत्र सादर करावे)

८) **महिला शेतकरी उत्पादक कंपनीचा आर्थिक उलाढाल :-**

(सद्यस्थितीत आर्थिक उलाढाल नसल्यास, प्रकल्पात निवड झाल्यानंतर अनुदानाचा प्रथम हप्ता वितरीत करण्यापुर्वी कंपनीची आर्थिक उलाढाल रु. २ लाख असल्याबाबतचे सी.ए. प्रमाणीत प्रमाणपत्र पत्र सादर करावे)

९) **गोदाम उभारणीच्या जागेचा तपशील :-**

(२५० मे. टन गोदाम उभारणीसाठी ४ गुंठे जागा आवश्यक)

**अ. महिला शेतकरी उत्पादक कंपनीची स्वत:ची जमीन आहे का? होय/नाही :- होय असल्यास**

i. जमीन क्षेत्र (एकूण क्षेत्र चौ.मी.) :-
ii. पक्क्या रस्त्यापासूनचे अंतर (कि.मी.):-

**नसल्यास**

**ब. महिला शेतकरी उत्पादक कंपनीने भाडेतत्वावर जमीन घेणार आहे का? होय/नाही :- होय असल्यास**

i. जमीन क्षेत्र (एकूण क्षेत्र चौ.मी.) :-
ii. पक्क्या रस्त्यापासूनचे अंतर (कि.मी.):-

१०) **संस्थेकडील प्रमुख पिकांचा तपशील :-**

(सर्व सभासदांचे पिकनिहाय क्षेत्र विचारात घेवून माहिती द्यावी.)

| क्र. | सभासद संख्या | पिक | क्षेत्र (एकर) | उत्पादन (मे. टन) | २५० मे. टन गोदामा मध्ये साठवणुकीकरीता उपलब्ध होणारा शेतमाल (मे. टन) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) उप-प्रकल्पासाठी प्रस्तावित बाबींचा तपशील :-

| क्र. | प्रस्तावित बाब | अंदाजित किंमत (रु.लाखात) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | गोदाम ( २५० MT) | |
| | CMA सेवा (१ वर्षाकरिता) | |
| | IoT (CCTV, Alarm, RFID Tags, Wireless Beacons, Door Safety Alarm, Temperature & Motion Sensor, Smoke Detector etc.) | |
| | स्वच्छता व प्रतवारी केंद्र (क्षमता -१/२/४ मे. टन प्रती तास) | |
| | संगणक व प्रिंटर | |
| | इतर | |
| | इतर | |
| एकूण | | |

(उपरोक्त घटकांचे अनुदान शासकीय योजनांच्या मापदंडानुसार देण्यात येणार आहे. उदा. गोदाम-MSWC चे मापदंड)

दिनांक- / /२०२३ अर्जदार संस्थेचे नाव

स्थळ-

संचालक १ संचालक २

(सही व शिक्का) (सही व शिक्का)

## <u>प्रपत्र - २</u>

### <u>अर्जा सोबत संस्थेने जोडावयाची कागदपत्रे :-</u>

१) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२) शेतकरी उत्पादक कंपनीची CS/CA प्रमाणित भागधारकांची यादी
३) महिला उत्पादक कंपनीची स्वत:ची जागा असल्यास ७/१२ उतारा किंवा जागा भाडेतत्वावर घेण्यार असल्याबाबतचे पत्र
४) सद्यस्थितीत ५०० भागधारक नसल्यास, प्रकल्पात निवड झाल्यानंतर अनुदानाचा प्रथम हप्ता वितरीत करण्यापुर्वी ५०० भागधारक करण्यात येणार असल्याबाबतचे पत्र
५) सद्यस्थितीत भागभांडवल रु.१ लाख नसल्यास, प्रकल्पात निवड झाल्यानंतर अनुदानाचा प्रथम हप्ता वितरीत करण्यापुर्वी भागभांडवल पुर्तता करण्यात येणार असल्याबाबतचे पत्र
६) सद्यस्थितीत आर्थिक उलाढाल रु. २ लाख नसल्यास, प्रकल्पात निवड झाल्यानंतर अनुदानाचा प्रथम हप्ता वितरीत करण्यापुर्वी कंपनीची आर्थिक उलाढाल पुर्तता करण्यात येणार असल्याबाबतचे पत्र

..................................................................................